# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७ /( ३२३/ ०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारासंचलित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

एम. आय. डी. सी. रोडकॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५ फोन नंबर ०७१३२ - २२३३२३

गोंविग/ विद्या /क्र/ ११५ /२०२४ **//परिपत्रक//** दिनांक १० / ४ /२०२४

प्रति,

प्राचार्य, सलग्नीत सर्व महाविद्यालये,
विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० ची राज्यात अंमलबजावणी करतांना पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेल्या श्रेयांक आराखडयानुसार विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये/ उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता (ईंटर्नशिप) उपलब्ध करुन देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.**

**संदर्भ:- १. उच्च व तंत्र शिक्षण, विभाग शासन निर्णय क्रमांक:- एनईपी-२०२४/प्र.क्र.११ /विशी -३ दिनांक- ०५ फेब्रुवारी,२०२४**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ नुसार दिनांक ०५/०२/२०२३ शासन निर्णयान्वये,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) -२०२० च्या अमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासीता ( इंटर्नशिप) हा महत्वाचा भाग असून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये आंतरवासीताद ( इंटरर्नशिप) लागूकरण्यात आली आहे. आंतरवासिता ( इंटरर्नशिप) ही विद्यार्थ्यांनमध्ये रोजगारक्षमता व उद्योजकता वाढावी म्हणून आंतरवासितेच्या माध्यमातून उद्योग-शिक्षण संबंध वाढीसाठी औद्योगिक जगत, एमएसएमई, व्यावसायिक आस्थापना, बँक व वित्तीय संस्था, अशासकीय संस्था इत्यादींच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना आंतरवासीता/ अप्रेंटिसशिप उपलब्ध करून देण्याचा यशस्वी प्रयत्न करावा. यासाठी प्रत्येक महाविद्यालये / उच्च शिक्षण संस्थांमध्ये **आंतरवासीता कक्ष स्थापन करण्यात यावे,तसेच आंतरवासिता संदर्भात महाविद्यालयांमध्ये नोडल अधिकारी नियुक्त करावा** मार्गदर्शक तत्वाबाबत शासननिर्णया नुसार कार्यवाही घ्यावी. तसेच सदर शासन निर्णय अधिनस्त सर्व महाविद्यालये तसेच पदव्युततर शैक्षणिक विभागामार्फत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावा.

करीता प्रमाणे सलंग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्यांनी व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागानी आंतरवासीता कक्ष निमार्ण करण्यात आले किंवा कसे? व नियुक्त करण्यातआलेले नोडल अधिकारी यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक व ईमेल याबाबतची माहिती दिनांक १८/०४/२०२४ रोजी पर्यंत academic.section@unigug.ac.in या ईमेल वर पाठवावी.

**सहपत्र :- वरील प्रमाणे**

( डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली

**प्रतिलिपी :** १) मा. कुलगुरु, यांचे स्विय सहाय्यक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

NEP-२०२३